RNI No. MAHBIL /2009/37831




# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १४५(६)] सोमवार, नोव्हेंबर ५, २०१८/कार्तिक १४, शके १९४० [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ४१५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक टीईएम. २०१८/सी.आर. २७/टीई-४.– महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यापुढे " सदर अधिनियम " असा उल्लेख करण्यात येईल) च्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक टीईएम. २०१८/ सी.आर. २७/टीई-४, दिनांक १९ मे २०१८ द्वारे अधिसूचनेच्या अनुसूची मधील स्तंभ २ मध्ये व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रम व उक्त पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत ;

ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून फार्म डी (Post Baccalaureate) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे सदर अधिनियमाच्या उद्देशाने फार्म डी (Post Baccalaureate) हा अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करणे योग्य आहे असे मत असल्याने ;

आता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) च्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अधिनियमाच्या उद्देशाने फार्म डी (Post Baccalaureate) हा अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करीत असून त्यासाठी शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक टीईएम. २०१८/सी.आर. २७/टीई-४, दिनांक १९ मे २०१८ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करीत आहे, जसे,—

१. अधिसूचनेच्या अनुसूची-ख मधील, क्रमांक ३ वरील फार्म डी या व्यावसायिक पाठ्यक्रमाची नोंद, वगळण्यात येत आहे.

२. अधिसूचनेच्या अनुसूची-ग मध्ये, क्रमांक ८ नंतर खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे :—

९ फार्म डी

**(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार**

(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;

(दोन) त्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या अनिवार्य विषयासह गणित किंवा जीवशास्त्र या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी किंवा त्यास समतुल्य परिक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागास प्रवर्ग आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;

**किंवा**

(दोन) त्याने राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या आणि सक्षम केंद्रीय प्राधिकरणाने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील पदविका परीक्षा किमान ५० टक्के (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागास प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के) गुणांसह उत्तीर्ण केलेली असली पाहिजे ;

(तीन) त्याने सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील सर्व विषयास बसून नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.

**(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार**

(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;

(दोन) त्याने भौतिकशास्त्र, रसानयशास्त्र या अनिवार्य विषयासह गणित किंवा जीवशास्त्र या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागास प्रवर्ग आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;

**किंवा**

(दोन) त्याने राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या आणि सक्षम केंद्रीय प्राधिकरणाने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील पदविका परीक्षा किमान ५० टक्के (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागास प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्याबाबतीत किमान ४५ टक्के) गुणांसह उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.

(तीन) त्याने एनईइटी (NEET) या परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक किंवा सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील सर्व विषयास बसून नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.

तथापि, एनईइटी (NEET) या परीक्षेमधील प्राप्तांक प्राप्त असलेल्या उमेदवारास सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांक प्राप्त असलेल्या उमेदवारापेक्षा प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**(३) अनिवासी भारतीय/भारताचे समुद्रपार नागरिकत्त्व असलेल्या व्यक्ती/भारतीय वंशाच्या व्यक्तींची, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक**

(एक) उमेदवाराने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या अनिवार्य विषयासह गणित किंवा जीवशास्त्र या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यामध्ये वरील विषय एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण मिळवलेले असावेत ;

**किंवा**

(एक) त्याने राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या आणि सक्षम केंद्रीय प्राधिकरणाने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील पदविका परीक्षा किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असली पाहिजे ;

(दोन) तो समुचित प्राधिकरणाने वेळेवेळी घोषित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा.

१० फार्म डी (Post Baccalaureate)

**(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार**

(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;

(दोन) त्याने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेकडून किंवा भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात किमान ५५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागास प्रवर्गाच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ५० टक्के गुण) मिळवलेले असावेत ;

(तीन) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) या परीक्षेत नॉन झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.

(चार) प्रायोजित उमेदवारांचे बाबतीत, उमेदवारास एखादी नोंदणीकृत भागीदारी संस्था/कंपनी/उद्योग/शैक्षणिक आणि/किंवा संशोधन संस्था अशा ठिकाणी किंवा शासनाची स्वायत्त संस्था किंवा शासनाचा विभाग अशा ठिकाणी ज्या विषयामध्ये प्रवेश मागण्यात येत असेल, त्या संबंधित विषयातील अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचा कमीत कमी दोन वर्षाचा पूर्ण वेळ कामाचा अनुभव असला पाहिजे.

**(२) अनिवासी भारतीय/भारताचे समुद्रपार नागरिकत्त्व असलेल्या व्यक्ती/भारतीय वंशाच्या व्यक्तींची, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक**

(एक) उमेदवाराने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने किमान ५५ टक्के गुण मिळवलेले असावेत ;

(दोन) समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा.

---

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd October 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATION INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSION AND FEES) ACT, 2015.

No. TEM. 2018/C.R.27/TE-4.— Whereas, the Government of Maharashtra has, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 3 read with clause (r) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. Act. No. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No. TEM-2018 / C.R.27 / TE-4 dated the 19th May 2018, notified the Professional Education Courses mentioned in column (2) of Schedule appended to the said notification, to be the Professional Education and specified the eligibility conditions and requirements for admission to the said professional courses ;

Whereas, the All India Council for Technical Education has given approval to start the Course of the Pharm-D. (Post Baccalaureate) from the Academic year 2018-19 in the State of Maharashtra ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to declare the said Pharm-D. (Post Baccalaureate) Course as the Professional Education for the purposes of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 3 read with clause (r) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. Act No. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby declares and notifies that the Pharm-D. (Post Baccalaureate) Course shall be a Professional Education for the purposes of the said Act ; and for the purpose, amends the Government Notification, Higher and Technical Education Department, No. TEM. 2018 / C.R.27 / TE-4, dated the 19th May 2018, as follows, namely :–

*(i)* In schedule 'B' appended to the said notification, entry at Sr. No. 3 relating to Professional Educational Course Pharm-D., shall be deleted ;

*(ii)* In schedule 'C' appended to the said notification, after the entry at Sr. No. 8, the following entry relating to the Professional Courses and their eligibility conditions and requirements for admissions shall be added, namely :–

| Sr. No. | Name of Professional Course | Eligibility conditions and requirements for admissions |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| **9** | **Pharm-D** | **(1) Maharashtra State Candidature Candidates,—**<br>*(i)* The candidate should be an Indian National ;<br>*(ii)* Passed HSC or its equivalent examination with subjects Physics and Chemistry as compulsory subjects alongwith one of the Mathematics or Biology and obtained at least 50 % marks (at least 45 % marks in case of candidates of Backward class categories and Persons with Disability belonging only to Maharashtra State) in the above subjects taken together ;<br>**Or**<br>*(ii)* Passed Diploma Course in Pharmacy from institutes affiliated to State Board and having approval of competent central authority and |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | | State Government and obtained at least 50 % marks (at least 45 % marks in case of candidates of Backward class categories and Persons with Disability belonging only to Maharashtra State) ;<br>*(iii)* The candidate should have appeared in all the subjects and obtained non zero score in the CET conducted by the Competent Authority.<br>**(2) All India Candidature Candidates,—**<br>*(i)* The candidate should be an Indian National ;<br>*(ii)* Passed HSC or its equivalent examination with subjects Physics and Chemistry as compulsory subjects alongwith one of the Mathematics or Biology and obtained at least 50 % marks (at least 45 % marks in case of candidates of Backward class categories and Persons with Disability belonging only to Maharashtra State) in the above subjects taken together ;<br>**Or**<br>*(ii)* Passed Diploma Course in Pharmacy from institutes affiliated to State Board and having approval of competent central authority and State Government and obtained at least 50 % marks (at least 45 % marks in case of candidates of Backward class categories and Persons with Disability belonging only to Maharashtra State) ;<br>*(iii)* The candidate should have obtained non zero positive score in the NEET or the candidate should have appeared in all the subjects in CET and should obtain non zero score in CET; However, preference shall be given to the candidate obtaining non zero positive score in NEET over the candidates who obtained non zero score in CET.<br>**(3) NRI/OCI/PIO, Children of Indian workers in the Gulf countries, Foreign National,—**<br>*(i)* The candidate should have passed the HSC or its equivalent examination with Physics and Chemistry as compulsory subjects along with one of the Mathematics or Biology, and obtained at least 50 % marks in the above subjects taken together ;<br>**Or**<br>*(i)* Passed Diploma Course in Pharmacy from institutes affiliated to State Board and having approval of competent central authority and State Government and obtained at least 50 % marks ;<br>*(ii)* Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act. |
| **10** | **Pharm-D. (Post Baccalaureate)** | **(1) For Maharashtra Candidature Candidates and All India Candidature Candidates,—**<br>*(i)* The candidate should be an Indian National ;<br>*(ii)* Passed Bachelor's Degree in Pharmacy from any All India Council for Technical Education or Pharmacy Council of India or Central or State Government approved institution, with at least 55% marks (at least 50% marks in case of Backward Class category and Persons with Disability Candidates belonging to Maharashtra State only) ;<br>*(iii)* Obtained Non Zero Positive Score in Graduates Pharmacy Aptitude Test (GPAT) conducted by All India Council for Technical Education; |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | | *(iv)* For sponsored candidates, minimum of two years of full time work experience in a registered firm/ company/ industry/ educational and/ or research institute/ any Government Department or Government Autonomous Organization in the relevant field in which admission is being sought. |
| | | **(2) NRI/OCI/PIO, Children of Indian workers in the Gulf countries, Foreign National,—** |
| | | *(i)* Passed Bachelor's Degree in Pharmacy from any All India Council for Technical Education or Pharmacy Council of India or Central or State Government approved institution, with at least 55% marks; |
| | | *(ii)* Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.